**पंतप्रधानांचे इस्रायली संसद ‘नेसेट’ ला संबोधन ( 25 फेब्रुवारी 2026)**

25 फेब्रुवारी 2026

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज जेरुसलेम मध्ये इस्रायली संसद 'नेसेट'च्या एका विशेष अधिवेशनाला संबोधित केले. इस्रायली संसदेला संबोधित करणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत.

2. ‘नेसेट'मध्ये आगमन झाल्यावर, नेसेटचे अध्यक्ष महामहिम अमीर ओहाना यांनी पंतप्रधानांचे स्वागत केले आणि त्यांना औपचारिक सन्मान देण्यात आला. पंतप्रधानांच्या भाषणापूर्वी ' इस्रायलचे पंतप्रधान महामहिम बेंजामिन नेतन्याहू, विरोधी पक्षनेते महामहिम यायर लॅपिड आणि अध्यक्ष ओहाना यांनी अधिवेशनात आपले विचार व्यक्त केले आणि भारत-इस्रायल संबंधांना भक्कम द्विपक्षीय पाठिंबा दर्शवला.

3. पंतप्रधानांनी विशेष सन्मानाबद्दल अध्यक्षांचे आभार मानून त्यांचे भाषण सुरू केले. भारत आणि इस्रायलमधील मैत्रीचे दृढ बंध अधोरेखित करताना पंतप्रधानांनी नमूद केले की, उभय देशांमधील प्राचीन सभ्यताकालीन संबंध आहेत आणि तंत्रज्ञान, नवोपक्रम, संरक्षण, सुरक्षा आणि धोरणात्मक अभिसरण यावर आधारित एक मजबूत समकालीन भागीदारी आहे. त्यांनी नमूद केले की शेती, ग्रामीण विकास, पाणी व्यवस्थापन, शाश्वतता आणि उद्योजकता या क्षेत्रांतील सहकार्यावर आधारित चैतन्याने भरलेल्या दोन्ही देशातील जनतेच्या परस्परसंबंधांनी या नात्याला एक गतिशील दृष्टिकोन दिला आहे. दोन्ही देशांतील ऐतिहासिक संबंध आणि लोकांच्या येण्या-जाण्याच्या प्रवासावर भर देताना पंतप्रधान म्हणाले की, इस्रायलमधील भारतीय समुदाय आणि भारतातील ज्यू समुदायाने दोन्ही देशांच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे.

4. दहशतवादाबाबत उभय देशांच्या शून्य सहनशीलतेच्या तडजोड न करणाऱ्या धोरणाची आठवण करून देत, पंतप्रधानांनी 7 ऑक्टोबर च्या दहशतवादी हल्ल्याबद्दल शोक व्यक्त केला आणि अशा क्रूरतेचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही, असे नमूद केले. या प्रदेशात शाश्वत शांतता आणि स्थैर्य प्रस्थापित करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व प्रयत्नांना त्यांनी भारताचा पाठिंबा दर्शवला. या संदर्भात, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने समर्थित गाझा शांती उपक्रमासाठी भारताच्या दृढ समर्थनावर त्यांनी प्रकाश टाकला. या संदर्भात, त्यांनी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने मान्यता दिलेल्या गाझा शांतता उपक्रमाला भारताचा ठाम पाठिंबा असल्याचे अधोरेखित केले. बहुपक्षीय क्षेत्रात भारत आणि इस्रायल यांच्यामधील सुरू असलेल्या सहकार्याची नोंद घेत, त्यांनी भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक प्रदेश [IMEC] आणि I2U2 आकृतीबंधात उभय देशांना सविस्तर संवाद करण्याचे आवाहन केले.

5. भारताच्या विकासाच्या गाथेवर पंतप्रधानांनी प्रकाश टाकला आणि व्यापार, गुंतवणूक, पायाभूत सुविधा विकास, हरित वाढ, स्टार्ट-अप्स, डिजिटल सोल्यूशन्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उभय देशांतील अधिक द्विपक्षीय सहकार्याची अपेक्षा केली, ज्यामुळे तरुणांच्या नवोपक्रम आणि सर्जनशीलतेला चालना मिळेल. द्विपक्षीय गुंतवणूक कराराच्या फलनिष्पत्ती बद्दल समाधान व्यक्त करताना, त्यांनी अद्याप सर्वतोपरी न उपयोगात आणलेल्या व्यापार क्षमता साकार करण्यासाठी लवकरात लवकर महत्त्वाकांक्षी मुक्त व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्याचे आवाहन केले.

6. भारतात इस्रायल साठी अलिकडेच स्थापन झालेल्या संसदीय मैत्री गटाचा लाभ घेऊन दोन्ही लोकशाहींमधील संसदीय संवाद अधिक वाढावा अशी आकांक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली. भारताचे वसुधैव कुटुंबकम [संपूर्ण जग एक कुटुंब आहे] हे तत्वज्ञान आणि तिक्कुम ओलम [जगाला बरे करणारे] इस्रायली तत्व हे एका सुसंवादी समाजासाठी सामायिक दृष्टिकोन दर्शवते; असे दोन्ही संस्कृतींच्या नीतितत्वांतील समांतरता अधोरेखित करत, पंतप्रधानांनी नमूद केले. पंतप्रधानांनी भारत-इस्रायल संबंधांमध्ये योगदान दिल्याबद्दल नेसेटच्या सदस्यांचे आभार मानले आणि आगामी पुरीमच्या सणासाठी शुभेच्छा दिल्या.

7. त्यांच्या भाषणानंतर, पंतप्रधानांना नेसेटचे सभापती महामहिम आमिर ओहाना यांनी *मेडल ऑफ नेसेट*हे पदक प्रदान करुन त्यांचा सत्कार केला. पंतप्रधानांनी हा सन्मान भारत आणि इस्रायलमधील चिरस्थायी मैत्रीला समर्पित केला आहे. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल [Link]

**जेरुसलेम**

25 फेब्रुवारी 2026